
असा मुलगा ज्याने राक्षसाला मारलं.

किट, मराठी : अश्विनी बर्वे





खूप जुनी गोष्ट आहे.

एका देशात एक मुलगा राहत होता.

तो नऊ वर्षांचा होता.

पण दिसायला तो खूप छोटा होता.

सगळे त्याला' 'छोटू' म्हणत. आई-वडील त्याला काही काम करू देत नसत. ते म्हणत तू अजून खूप छोटा आहे.



छोट्याच्या वडिलांजवळ एक घोडा होता.
पण छोटूची आई त्याला घोडेस्वारी करू देईल?
बिलकुल नाही. “तू खूप छोटा आहेस,” ती म्हणाली.
“तुला जखम व्हावी असं मला वाटत नाही.”


छोटीच्या वडिलांजवळ एक धनुष्यबाण होता. पण काय
त्याचे वडील त्याला तो वापरू देतील? बिलकुल नाही.
“तू अजून खूप छोटा आहे,” तो म्हणत. “तुला काही व्हावं
असं मला वाटत नाही.”



छोट्याच्या घरापासून काहीसं दूर एक राक्षस राहत होता. तो खूपच मोठा होता. तो दुपारच्या जेवणात १०० गायी खात असे. नाष्ट्याला तो १०० अंडी खात असे.



“ठीक आहे की मी छोटा आहे,” छोट्या म्हणाला. “पण मी मोठ्या मोठ्या गोष्टी करू शकतो.” एक दिवस मी त्या करून दाखवेन.”






राक्षसाने सगळ्या गायी खाल्ल्या.
राक्षसाने सगळी अंडी खाल्ली.
त्याने नदीचे सगळे पाणी पिऊन टाकले.
तो एक दुष्ट राक्षस होता.



कधी-कधी तो घरांच्या छतावर उड्या मारायचा. धडाम! करून तो उडी मारायचा. राक्षसासाठी तो एक फक्त खेळ होता. पण ज्यांची घरं तुटत त्यांच्यासाठी ही एक दुःखाची गोष्ट होती.

तो राक्षसला सगळ्या जादू सुद्धा माहीत होत्या.
तो स्वतःला कोणत्याही रुपात बदलू शकत असे.
तो स्वतःला चित्त्याच्या रुपात बदलू शकत असे.





तो स्वतःला एका जंगली हत्तीमध्ये सुद्धा बदलू शकत असे.

राक्षस स्वतःला पंखवाला नाग (ड्रगन) मध्ये बदलू शकत होता. खुद को पंख वाले नाग (ड्रैगन) में बदल सकता था.





प्रत्येकाला राक्षसाची खूप भीती वाटत होती. देशाच्या राजाने सांगितले, “आता लवकरच देशात खायला-प्यायला राहणार नाही. कोण आपल्याला या राक्षसापासून सोडवेल? जो या राक्षसापासून आपली सुटका करेल त्याला एक मोठं इनाम दिलं जाईल.”

मग राजाने घोषणा केली:





छोट्याने घोषणा वाचली. “दिसायला जरी मी छोटा दिसत असलो,” छोटू म्हणाला, “पण मी मोठं काम करू शकतो.” आता मी त्यांना मोठं काम करून दाखवेन.”

मग छोट्याने एका फलकावर लिहले:





मग छोटूने एक पिशवी घेतली. त्यात पांढऱ्या पनीरचा एक मोठा तुकडा ठेवला. ते पनीर दिसायला दगडासारखं दिसत होतं. त्याने पिशवीत एक दगड सुद्धा ठेवला होता..

त्याने पिशवीत एक छोटी पांढरट चिमणी सुद्धा ठेवली. चिमणी दिसायला पांढरट चेंडू सारखी होती. त्याने पिशवीत एक पांढरट चेंडू सुद्धा ठेवला.



मग त्याने पिशवीत अजून एक गोष्ट ठेवली, माश्या मारणारी रॅकेट.



मग छोटूने आपल्या आई-वडिलांना
एक चिट्ठी लिहिली.

प्रिय आई/बाबा
मी त्या राक्षसापासून सगळ्यांना
सोडवण्यासाठी जात आहे.
आपला लाडका
छोटू



मग छोटूने आपली पिशवी उचलली,
त्याने आपल्या हातात फलक धरला.
मग त्याने आपला प्रवास सुरु केला.



तो चालत राहिला, चालत राहिला.
तो एका मोठ्या पहाडावर चढला.
पहाडावर त्या राक्षसाचं घर होतं.

छोटूने राक्षसाच्या घराचा दरवाजा वाजवला.
पण कोणी दरवाजा उघडला नाही.



छोटूने दरवाजा वाजवला,

खट-खट-खट!

कोणी दरवाजा उघडला नाही.

मग छोटूने परत दरवाजा लोटला.





तेव्हा राक्षस त्याच्यासमोर आला.

“तू मला शोधत होतास का?”

राक्षसाने छोटूला विचारलं.

“हो, बरोबर,” छोटू म्हणाला.

“मी तुमच्याच शोधात होतो.”



“अरे, हे तर सांग की तू कोण आहेस?”

राक्षस म्हणाला.

“बघ, माझा फलक वाच,” छोटू म्हणाला.



राक्षसाने फलक वाचला.

मग तो जोर-जोरात हसायला लागला.

“हा-हा-हा-हा!, ही-ही-ही-ही!”

“अच्छा तर तू ज़मीन आणि समुद्रावरचा सगळ्यात सामर्थ्यवान प्राणी आहे? राक्षसाने विचारलं. हे म्हणून तो परत हसू लागला. “हा-हा-हा-हा! ही-ही-ही-ही!”






“तुला पाहिजे तेवढं तू हास,” छोटू म्हणाला. “पण मी तुझ्यापेक्षा जास्त सामर्थ्यवान आहे. हे मी तुला दाखवून देईन.”

"अच्छा," राक्षस म्हणाला.

"हे बघ माझ्या घरात खूप सोनं पडलं आहे. जर तू सिद्ध केलं की तू माझ्यापेक्षा जास्त ताकदवर आहे तर ते सगळं सोनं मी तुला देईन."

"मला तुझ्याकडच्या सोन्याचा काही मोह नाही," छोटू म्हणाला.





"अच्छा!" तर असं आहे. "म्हणजे तुला माझी भीती वाटत आहे."

“बिलकुल नाही!” छोटू म्हणाला.
“मी तुझ्यापेक्षा जास्त ताकदवान आहे. मला तुझं सोनं नको आहे. मला तुझ्याकडून काय पाहिजे मी सांगू का?”
“अच्छा, मग सांग तुला माझ्याकडून काय हवं?” राक्षसाने विचारलं.





“मला वाटतं की तू इथून खूप दूर निघून जावं,” छोटू म्हणाला. “आमच्या सगळ्या गायी तू खाऊन टाकल्या. आमची सगळी अंडी तू खाल्ली. नदीचं सगळं पाणी तू पिऊन टाकलं. जर मी सिद्ध केलं की मी तुझ्यापेक्षा जास्त ताकदवान आहे तर तुला इथून जावं लागेल.”



“आता मी माझ्या हातात दगड घेतो,” छोटू म्हणाला.
मग छोटूने पिशवीतून पांढरा पनीरचा तुकडा घेतला.



“ठीक आहे,” राक्षस म्हणाला.
“आधी हे दाखवून दे, की तू माझ्यापेक्षा जास्त ताकदवान आहेस ते.”
“मग हा दगड हातात घे,” छोटू म्हणाला.
राक्षसाने छोटू कडून दगड घेतला.

“आता बघ मी माझा दगड रगडून त्यातून पाणी कसं काढतो ते,” छोटू म्हणाला. मग छोटूने पनीर दाबलं. पनीर मधून पाणी बाहेर येवू लागलं. “आता तू तुझ्या दगडातून पाणी काढून दाखव,” छोटू म्हणाला.





राक्षसाने आपला दगड खूप जोरात दाबला. पण त्यातून अजिबातच पाणी आलं नाही. त्याने दगड परत परत दाबला, पण त्यातून पाण्याचा एक थेंबही बाहेर आला नाही. मग राक्षसाचे हसू थांबले.



“हे तर मी ही करू शकतो,” राक्षस म्हणाला.
”मला करून दाखव,” छोटू म्हणाला.
मग छोटूने पिशवीतून एक पांढरा चेंडू काढला.
त्याने तो राक्षसाला दिला. “आता मी या चेंडूला
आपल्या हातात धरेन,” छोटू म्हणाला. त्याने मग छोटी
पांढूरकी चिमणी पिशवीतून काढली आणि आपल्या
हातात पकडून ठेवली. “आता तू आधी चेंडू फेक,”
छोटू म्हणाला.

“बघ,” छोटू म्हणाला. “मी तुला दुसऱ्यांदा दाखवतो
की मी तुझ्यापेक्षा जास्त ताकदवान आहे. मी इतका
शक्तिमान आहे की, मी एक चेंडू तुझ्यापेक्षा जास्त
उंच फेकू शकतो. मी चेंडू इतका उंच फेकेन की तो
परत खाली जमिनीवर येणार नाही.”





राक्षसाचा चेंडू वरवर, खूप वर गेला. शेवटी तो आकाशात एका बिंदू सारखा दिसायला लागला. चेंडूने एवढी उंची गाठली होती की, तो खाली येण्याची वाट पाहावी लागली.



"आता मी चेंडू फेकतो," छोटू म्हणाला. मग त्याने चेंडू फेकला. ती पांढूरकी चिमणी होती. आकाशात ती उंच उंच उडत गेली. ती आकाशात छोट्या बिन्दुसारखी दिसू लागली. मग ती डोळ्यासमोरून गायब झाली. छोटू आणि राक्षसाला ती परत दिसली नाही.


“बघ माझा चेंडू इतका वर गेला,” छोटू म्हणाला.
“परत तो खाली जमिनीवर आला नाही.”
“आपण त्याची वाट पाहू,”






मग ते दोघं वाट पाहत राहिले. त्यांनी खुपवेळ वाट पाहिली. पण चेंडू परत आला नाही. “तू पाहिलं?” छोटू म्हणाला. “मी तुझ्यापेक्षा जास्त ताकदवान आहे. मी दगड रगडून पाणी काढू शकतो, पण ते तू करू शकत नाही. मी तुझ्यापेक्षा जास्त उंचीवर चेंडू फेकू शकतो. म्हणून तुला आता इथून दूर कुठेतरी निघून जायला पाहिजे.”

नाही! नाही! राक्षस म्हणाला.हीं!
“मी तुझ्यापेक्षा अधिक बलवान आहे.”
मी एक जादुगार राक्षस आहे.मी
स्वतःला वाघात बदलू शकतो बघ?”





“मी स्वतःला एक जंगली हत्तीत बदलू शकतो,
बघ?”



“मी स्वतःला एक ड्रैगन (पंखवाला
नाग) मध्ये रुपांतर करू शकतो, बघ?”

“हो, मी बघितलं,”

मग छोटू म्हणाला, “आपली जादू तर खूप शक्तिशाली आहे. कोणत्याही एका मोठ्या राक्षसासाठी एक मोठा वाघ होणं तसं सोप्प असेल. पण तुम्ही स्वतःला एका छोट्या मांज्जरीत बदलू शकता का?” “बिलकुल,” राक्षस म्हणाला.

“मला दाखवा बरं,” छोटू म्हणाला.





“अच्छा, मग,” राक्षस म्हणाला.

“माझी जोपर्यंत मर्जी असेल तोपर्यंत मी इथेच राहीन, मला पाहिजे तेवढ्या गायी खाईन. माझ्या मर्जीने पाणी पिईन. आता मी एका मोठ्या वाघात बदलून तुला सुद्धा खाईन.”

मग राक्षसाने स्वतःला एका छोट्या मांजरात बदलवलं. छोटूने मांजराला कुरवाळलं





मग छोटू म्हणाला, “हे तू तुम्ही खूप छान केलं. पण तुम्ही स्वतःला एका छोट्या जीवात बदलू शकता का? छोटा उंदीर होवू शकता का?
“हो!” राक्षस म्हणाला.

“अच्छा, मला दाखवा,” छोटू म्हणाला. मग राक्षस आपले रूप पालटून एक उंदीर झाला. छोटूने छोट्या उंदराला पनीरचा तुकडा दिला.

.





“तुम्ही खरंच पात्र आहात,” छोटू म्हणाला.
“पण एक गोष्ट तुम्ही करू शकणार नाही.”



“ती कोणती?” राक्षसाने विचारलं. “मी काहीही करू शकतो,”

“नाही,” छोटू म्हणाला.

“तुम्ही स्वतःला एका छोट्या माशीत बदलू शकत नाही. हे काम तुमच्यासाठी मुश्कील आहे.”

“मी हे करू शकतो,” राक्षस म्हणाला.

“मला दाखवा,” छोटू म्हणाला. मग राक्षसाने एका छोट्या माशीचे रूप घेतले आणि ......





.... मग छोटूने माश्या मारण्याच्या
रॅकेटने माशीला मारून टाकले.
अशा प्रकारे राक्षसाचा अंत झाला.!

समाप्त